नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी
अव्वल कारकून व मंडळ अधिकारी
यांच्यासाठी प्रमाण ठरवून देण्याबाबत....

# महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
## शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३९५/ई-९

३२ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत,
कफ परेड, मुंबई - ०५.
तारीख: २ जानेवारी, २०१३.

**पहा**

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही-१४९६/प्र.क्र.४७०/ई-७, दिनांक १३ ऑक्टोबर, १९९८
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.८३७/ई-७, दिनांक २० नोव्हेंबर, १९९८
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३९५/ई-९, दिनांक ६ जुलै, २०१३.

## शासन निर्णय

शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक एसआरव्ही-१४९६/प्र.क्र.४७०/ई-७, दिनांक १३ ऑक्टोबर, १९९८ अन्वये नायब तहसिलदार संवर्गासाठी सुधारीत सेवा प्रवेश नियम विहित करण्यात आलेले आहेत. या सेवाप्रवेश नियमातील नियम ५ मध्ये अशी तरतूद आहे की, नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीने व नामनिर्देशनाने नियुक्ती करण्याचे प्रमाण ६७:३३ असे राहील. त्याचप्रमाणे या नियमातील नियम ४ (१) मध्ये अशी तरतूद आहे की, अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या संवर्गातील व्यक्तींना कोणत्या प्रमाणात पदोन्नती द्यावयाची हे संबंधित संवर्गातील कर्मचा-यांची संख्या विचारात घेतल्यानंतर शासनाकडून प्रत्येक विभागासाठी कार्यकारी आदेशाद्वारे विहित करण्यात येईल. त्यानुसार राज्यातील विविध विभागांसाठी नायब तहसिलदार संवर्गामध्ये अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या दोन संवर्गातून पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण संदर्भाधीन अनुक्रमांक (२) येथील शासन निर्णय दिनांक २० नोव्हेंबर, १९९८ अन्वये निश्चित करण्यात आले होते.

२. सदर प्रमाणाचा फेरआढावा घेऊन संदर्भाधीन अनुक्रमांक (३) येथील शासन निर्णय दि.६ जुलै, २०१३ अन्वये पदोन्नतीचे प्रमाण निश्चित करण्यात आले होते. सदर शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०१३ मध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या काही काळ विचाराधीन होती. या संदर्भात सर्व संबंधितांशी

विचारविनिमय केल्यानंतर पदोन्नतीच्या प्रमाणात खाली नमूद केल्यानुसार बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

३. सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.३९५/ई-९, दिनांक ६ जुलै, २०१३ अधिक्रमित करण्यात येत असून राज्यातील विविध विभागांसाठी नायब तहसिलदार संवर्गामध्ये अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या दोन संवर्गातून पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण खालीलप्रमाणे विहित करण्यास याद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

अ) दिनांक ३०.६.२०१४ पर्यंत नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देताना अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाचे सहा महसूल विभागामधील प्रमाण खालीलप्रमाणे राहील-

| अ.क्र. | विभागाचे नाव | पदोन्नतीचे प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | अव्वल कारकून | मंडळ अधिकारी |
| १ | कोकण विभाग | ३ | १ |
| २ | पुणे विभाग | २ | १ |
| ३ | नाशिक विभाग | २.४० | १ |
| ४ | औरंगाबाद विभाग | २ | १ |
| ५ | अमरावती विभाग | २.१४ | १ |
| ६ | नागपूर विभाग | ३.२९ | १ |

ब) दिनांक १.७.२०१४ पासून नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नती देताना अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाचे सहा महसूल विभागामधील प्रमाण खालीलप्रमाणे राहील-

| अ.क्र. | विभागाचे नाव | पदोन्नतीचे प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | अव्वल कारकून | मंडळ अधिकारी |
| १ | कोकण विभाग | ३.१६ | १ |
| २ | पुणे विभाग | २.३४ | १ |
| ३ | नाशिक विभाग | २.४० | १ |
| ४ | औरंगाबाद विभाग | २.१७ | १ |
| ५ | अमरावती विभाग | २.१४ | १ |
| ६ | नागपूर विभाग | ३.२९ | १ |

४. वरील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पदोन्नतीने भरावयाच्या पदांचे प्रमाण हे नायब तहसिलदार संवर्गामध्ये रिक्त होणा-या पदांसाठी लागू करावयाचे नसून ते नायब तहसिलदार संवर्गातील पदोन्नतीने भरावयाच्या एकूण पदसंख्येला लागू राहील. त्याचप्रमाणे आता विहित केलेल्या या प्रमाणांचा दरवर्षी आढावा घेण्यात यावा. यापुढे नायब तहसिलदार संवर्गातून पदोन्नतीने भरावयाची

पदे अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातून वरील परिच्छेद क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार भरण्यात यावीत.

५. अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातून नायब तहसिलदार संवर्गात पदोन्नतीनंतर पदोन्नत अधिका-यांची निवडसूचीतील ज्येष्ठता कशी निश्चित करावी, याबाबत स्वतंत्र आदेशान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात येतील.

६. नायब तहसिलदार संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी अव्वल कारकून व मंडळ अधिकारी या संवर्गामधील संबंधित कर्मचा-यांची सेवा किमान ३ वर्षे झाली असणे आवश्यक आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४०१०२१६३३३६४७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madhav Narayan Kale

Digitally signed by Madhav Narayan Kale
DN: CN = Madhav Narayan Kale, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST
Date: 2014.01.02 17:10:06 +05'30'

**( माधव काळे )**
शासनाचे उपसचिव

**प्रत,**

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (पत्राने)
४. सहसचिव (कार्यासन १२) ,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. सहसचिव (कार्यासन १६ ब) ,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६. कार्यासन ई-७, महसूल व वन विभाग, ३२ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, कफ परेड, मुंबई - ०५.
७. कार्यासन ई-१०, महसूल व वन विभाग, ३२ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, कफ परेड, मुंबई - ०५.
८. निवडनस्ती ई-९ कार्यासन, महसूल व वन विभाग, ३२ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर वन इमारत, कफ परेड, मुंबई - ०५.